साप्ताहीक मराठी बातमी पत्र

मराठी वृत्तपत्र,वृत्तवाहिनी,मराठी न्यूजपोर्टल www.shabnamnews.in

# शबनम न्यूज

पिंपरी-चिंचवड-पुणे

» मुख्य संपादिका : शबनम सय्यद

» SHABNAM NEWS » शुक्रवार दि. 31/01/2025 » वर्ष 9 वे » अंक 24 » पाने 8 » किंमत 5.रु







SHABNAM NEWS
शबनम न्यूज
विश्वसनीय वृत्तसंस्था
|| शुक्रवार दि. 31/01/2025 ||

# उद्योजकांना मूलभूत सुविधा द्या : अभय भोर

➔शबनम न्यूज मीडिया ग्रुप



पिंपरी चिंचवड : एमआयडीसी येथे आज फोरम ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशनच्या उद्योजकांची बैठक संपन्न झाली या बैठकीत क प्रभाग अ प्रभाग स्पाईन रोड पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक आणि उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

एमआयडीसी परिसरात भेडसावणाऱ्या समस्यांबाबत आज श्री अभय भोर यांच्या अध्यक्षतेखाली उद्योजकांची बैठक संपन्न झाली. बैठकीत एमआयडीसीतील विविध प्रश्नांवर चर्चा झाली अनेक उद्योजकांनी आपल्याला भेडसावणाऱ्या समस्या या ठिकाणी मांडल्या. यावेळी एमआयडीसीतील कचरा समस्या वाहतूक समस्या ड्रेनेज सुविधा रोड लाईट ई.टी.पी प्लांट चोऱ्या आणि अतिक्रमणे चौक विस्तारीकरण याबाबत चर्चा करण्यात आल्या अध्यक्ष श्री अभय भोर यांनी महानगरपालिकेला येत्या दहा दिवसात उद्योजकांच्या प्रश्नांवर उत्तर नाही मिळाले तर महानगरपालिकेत भव्य आंदोलन घेणार असल्याचा इशारा दिला एमआयडीसी परिसराकडे शासनाच्या सर्वच विभागांचे पूर्ण दुर्लक्ष झाले असून फक्त कर रुपी पैसा जमा करण्याचे काम चालू आहे उद्योजकांच्या समस्या दिवसेंदिवस कमी होण्याऐवजी वाढतच चालल्याच्या दिसून येत आहे उद्योजकांना अनेक सोयी सुविधा या पैसे देऊन विकत घ्याव्या लागतात आणि परिसराला अतिक्रमण मोठ्या प्रमाणात झाले असून या ठिकाणीउद्यान विभागाच्या ढिसाळ कारभारामुळे परिसरात लाईटच्या खांबांवर आलेल्या फांद्यामुळे उजेड पडत नाही कित्येकदा सांगून देखील उद्यान विभागाचे दुर्लक्ष आहे या ठिकाणांच्या अनेक चौकांना लोकांनी वेगवेगळी नावे दिली आहेत याच्याकडे अप्रभात अधिकाऱ्यांचे देखील दुर्लक्ष असल्याचे सांगण्यात आले अनेक चौकांमध्ये विस्तारीकरण करणे गरजेचे असून उद्योजकांना वाहतुकीच्या समस्येला मोठ्या प्रमाणात सामोरे जावे लागते या ठिकाणी बंद पडलेल्या टपऱ्या बंद पडलेली वाहने तसेच रस्त्यावर अनधिकृत पणे अनेक गैरव्यवहार भंगाराची दुकाने चालू आहेत त्यामुळे चोऱ्यांच्या प्रमाणामध्ये मोठी वाढ झाली असल्याचे उद्योजकांनी सांगितले खूप मोठे प्रश्न निर्माण झाले आहेत . पिंपरी चिंचवड शहरातील उद्योग टिकवायचे असतील तर महानगरपालिका एमआयडीसी पोलीस विभाग या सर्वच विभागांनी पुढाकार घेऊन उद्योजकांच्या समस्या सोडवाव्यात असे वक्तव्य केले या ठिकाणी क प्रभाग अधिकारी श्री कांबळे साहेब यांनी महानगरपालिकेतर्फे त्वरित याबाबत पावले उचलून लवकरच बैठक लावण्यात येईल आणि या बैठकीत सर्व संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून यावरील उपाययोजना करण्यात येणार असल्याचे सांगितले यावेळी भोसरी स्पाईन रोड पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक श्री किरण पाठारे साहेब यांनी परिसरामध्ये उद्योजकांना मार्गदर्शन केले आणि विविध उपायोजनांबाबत चर्चा केली तसेच उद्योजकांना कोणत्याही स्वरुपाचा त्रास जाणवल्यास त्वरित पोलीस स्टेशनला सांगितल्यास त्यावर कठोरात कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा आश्वासन दिले

या ठिकाणी एमआयडीसीतील अनेक प्लॉट धारक मॅन्युफॅक्चरर कंपन्यांचे उद्योजक उपस्थित होते अनेक उद्योजकांनी आपले विचार या ठिकाणी व्यक्त केले.

# नागरिकांनी फ्रॉड 'एसएमएस'ला बळी पडू नये
## महानगरपालिकेचे नागरिकांना आवाहन




➔शबनम न्यूज मीडिया ग्रुप

पिंपरी, पिंपरी - चिंचवड शहरामध्ये सध्या ज्या नागरिकांची पाणीपट्टी थकीत आहे अशा मालमत्तेचे नळकनेक्शन तोडण्याची कारवाई सुरु आहे. महापालिकेच्या माध्यमातून याबाबत नागरिकांना थकीत पाणीपट्टी भरण्याचे वेळोवेळी 'एसएमएस' द्वारे व इतर माध्यमातून आवाहन करण्यात येत आहे. परंतू, शहरात नागरिकांचे आज रात्री 9 वाजता नळकनेक्शन तोडण्यात येईल, अशा आशयाचे देवेश जोशी, महापालिका अधिकारी या नावाने व 9309445824/9325848115 या मोबाईल क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहनपर फसवणूक करणारा 'एसएमएस' पाठविण्यात येत आहे. असे 'एसएमएस' हे नागरिकांची फसवणूक करणारे असून याकडे नागरिकांनी दुर्लक्ष करावे. असे महानगरपालिकेकडून आवाहन करण्यात आले आहे.

चौकट – कोणत्याही लिंकद्वारे कोणतेही ॲप्लिकेशन मोबाईलमध्ये डाऊनलोड करु नका! तुमच्या माहितीमध्ये बदल आहेत, तुम्ही माहिती बदल करण्यासाठी सदर ॲप्लिकेशन डाऊनलोड करण्यासाठीचे एसएमएस तुमच्या व्हाट्सअपवरती येत आहेत. तरी त्याप्रकारच्या लिंक, ॲप्लिकेशन डाऊनलोड न करता त्याकडे दुर्लक्ष करावे. आपणास आपल्या माहितीबाबत, पाणीपट्टीबाबत कोणत्याही प्रकारच्या शंका असल्यास महानगरपालिकेच्या 8888006666 या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा. असे आवाहन करसंकलन विभागाद्वारे करण्यात आले आहे.

**कोट –नागरिकांनी 'फ्रॉड' एसएमएसकडे दुर्लक्ष करावे !**

महानगरपालिकेच्या करसंकलन विभागाकडून पाणीपट्टी वसुलीची मोहिम सुरु करण्यात आली आहे. नागरिकांना करसंकलन विभागाकडून थकीत पाणीपट्टी भरण्याचे अधिकृत क्रमांक व सिस्टिमवरुन एसएमएस करण्यात येत आहेत. आपणास कधीही कोणत्याही मोबाईल क्रमांकांवरुन पाणीपट्टी भरण्याचे आवाहन करण्यात येत नाही. तरी नागरिकांनी अशा क्रमांकावरुन आलेल्या एसएमएस कडे दुर्लक्ष करुन आर्थिक फसवणूक होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

-अविनाश शिंदे, सहाय्यक आ□क्त, कर आकारणी व कर संकलन विभाग, पिंपरी – चिंचवड महानगरपालिका

# करसंकलन विभागाकडून करसंवादाचे आयोजन.

➔शबनम न्यूज मीडिया ग्रुप

पिंपरी, दि. 30 जानेवारी 2025 :- करदात्यांच्या शंकाचे निरसनासाठी करसंकलन विभागाने करसंवाद उपक्रम सुरु केला. नागरिकांच्या मालमत्ताकराबाबतच्या शंका, प्रश्नांचा निपटारा होण्यासाठी शनिवार, दि. 1 फेब्रुवारी 2025 रोजी सकाळी, 11.30 वाजता करसंवादाचे ऑनलाइन व ऑफलाइन स्वरुपात आयोजन केले असून नागरिकांनी त्यामध्ये सहभाग घेऊन प्रतिसाद द्यावा. असे आवाहन करसंकलन विभागाकडून करण्यात आले आहे. नागरिक व अधिकारी यांच्यामध्ये थेटसंवाद असा उद्देश असलेल्या करसंवादामध्ये नागरिकांनी विचारलेल्या प्रश्नांबाबत विभागाकडून तत्काळ माहिती पुरविण्यात येईल.

यामुळे नागरिकांनी महानगरपालिकेच्या यूट्यूब चॅनेल व सोशल मीडियावर अकाऊंटवर आपले प्रश्न विचारुन आपल्या शंकाचे तात्काळ निरसन करावे. असे आवाहन करण्यात आले आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या करसंकलन विभागाकडून शहरातील मालमत्ताधारकांना मालमत्ता कर भरण्याचे विविध माध्यमातून आवाहन करण्यात येत आहे.

सध्या शहरातील थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करण्याची धडक मोहिम सुद्धा सुरु आहे. मालमत्ताधारकांनी आपला मालमत्ता कर वेळेत भरुन मालमत्ता जप्तीची कारवाई टाळावी. आपल्या मालमत्तेबाबत कोणत्याही शंका असल्यास विभागाकडे मांडून त्याबाबत शंकाचे निरसन करुन घ्यावे. याचसाठी शनिवारी करसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने करसंवादामध्ये सहभाग नोंदवून मालमत्ता जप्तीची धडक मोहिम व आदी अभियानाबाबत माहिती घ्यावी. अविनाश शिंदे, सहाय्यक आयुक्त, करआकारणी व करसंकलन विभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका



शबनम न्यूज विश्वसनीय वृत्तसंस्था || शुक्रवार दि. 31/01/2025 ||

# वायु व जल प्रदूषणावर तोडगा काढावा

## माजी नगरसेविका मीनल यादव



➔शबनम न्यूज मीडिया ग्रुप

पिंपरी चिंचवड शहरातील मोहन नगर परिसरातील सूर्योदय कॉम्प्लेक्स या निवासी इमारतीच्या आसपास स्वस्तिक सिमेंट कारखाना आहे या कारखान्यामुळे येथे विषारी व तिखट रासायनिक उत्सर्जन होत असते त्यामुळे येथील स्थानिक नागरिकांना आरोग्याचा धोका निर्माण झाला आहे, अनेकांना श्वास घेण्यास समस्या उत्पन्न होत आहेत, तसेच विशेषतः लहान मुले वृद्ध यांना त्याचा जास्त त्रास जास्त होत आहे.तसेच सूर्योदय कॉम्प्लेक्स च्या इमारतीच्या मागे वाहणाऱ्या कालव्यात औद्योगिक कचरा नेहमी टाकला जातो, तो गंभीर जलप्रदूषणाचा स्रोत बनला आहे, अज्ञात केमिकल कंपन्या या नाल्यात रसायनिक कचरा सोडत असतात त्यामुळे अतिशय दुर्गंधी पसरत आहे, त्यामुळे नागरिकांच्या डोळ्यांना जळजळ आणि श्वास घेण्यासही त्रास होत आहे, त्यामुळे या भागातील उद्भवणाऱ्या या वायू प्रदूषण व जलप्रदूषणावर कायमचा तोडगा काढावा तसेच घातक रासायनिक कचरा टाकणाऱ्या व्यावसायिकांवर कडक कारवाई करावी अशी मागणी या भागातील माजी नगरसेविका मीनल विशाल यादव यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. मीनल यादव यांनी महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन देताना त्यांच्यासोबत स्मिता कुऱ्हाडे, माधवी भोसले,माधुरी खाडे,बिस्मिल्ला बी खान, मोनू रॉय, नंदकुमार मॅडम, मंगल मोटे, अश्विनी टाकळकर, रुपाली मुजुमले, हे नागरिक उपस्थित होते.उपस्थित होते.

# आयआयईबीएमचे विद्यार्थी रमले जुन्या आठवणींत




➔शबनम न्यूज मीडिया ग्रुप

भूमकर चौक येथील आयआयईबीएम कॉलेजमध्ये गेली 25 वर्षापासूनचे उत्तीर्ण झालेल्या माजी विद्यार्थ्यांसाठी माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मान्यवरांनी हवेत फुगे सोडून या माजी विद्यार्थी मेळाव्याचे उदघाटन करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांनी एकमेकांना अलिंगन, हस्तादोलन देत जुन्या आठणींना उजाळा दिला.

यावेळी प्रा.डॉ.उत्तराराजे नाईक निंबाळकर, सत्यजितराजे नाईकनिंबाळकर, आय. आय. ई.बी.एम.चे अध्यक्ष कर्नल विनोद मारवाह,व्यवस्थापकीय संचालक डॉ.जयसिंग मारवाह,अरुणा मारवाह,आधीष्ठाता डॉ. पूनम निकम, इंडस चॅम्प स्कुलच्या प्राचार्या प्रा.नम्रता जियानी,संचालक प्रशासन कर्नल रवींद्र कुमार आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष मारवाह म्हणाले कि, पंचवीस वर्षाची वाटचाल सहज सोपी नव्हती तर आमच्या साठी आव्हानात्मक होती. आमच्या कॉलेजमध्ये इतर कॉलेजमध्ये हॅलो, गुडमॉर्निंग अशा इंग्रजी शब्द प्रयोग होत नाही तर" जय हिंद" म्हंटले जाते. विद्यार्थ्यांना देश प्रेम आणि सैनिकांप्रमाणे शिस्त लावणे हा हेतू आहे.एक सैन्य कॉलेजसारखी संस्कृती मुलांमध्ये रुजवण्याचा प्रयत्न करीत आहोत.एव्हढेच नाही तर मारवाह फौंडेशनच्या माध्यमातून माजी सैनिकांना विविध सहकार्य केले जाते.

डॉ. जयसिंग मारवाह म्हणाले कि, गेली 25 वर्षांत सुमारे 5 हजार विद्यार्थी शिकून बाहेर पडले.आमचे विद्यार्थी आज 8 खंडापैकी 7 खंडात विविध उच्च पदावर कार्यरत आहे.

मान्यवारांच्या हस्ते केक कापून कॉलेजचा 25 वा वर्धापण दिन साजरा करण्यात आला.

यावेळी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी पंजाबी भांगडा, राजस्थानी घुमर,साऊथ इंडियन नृत्य, आणि मराठी गोंधळावर नृत्य सादर करुन राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडवून आणले.विद्यार्थ्यांच्या या नृत्याला माजी विद्यार्थ्यांनी टाळ्यांची दाद दिली.

2002 ते 2025 प्रत्येक बॅचेस चे 25 झाडांचे वृक्षारोपणाचा उपक्रम एक आठवण म्हणून राबवण्यात आला.यावेळी माजी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत वृक्षारोपणाचा कार्यक्रम चांदखेड येथे संपन्न झाला.

माजी विद्यार्थ्यांच्या चिमुकल्यासाठी देखील मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

मेळाव्याचे आयोजनासाठी माजी विदयार्थी मृदुल नागपाल, गौरव काबरा, मंदार ठोसर,राकेश कंडारी यांनी पुढाकार घेतला होता.

# विशालभाऊ वाकडकर सोशल फाउंडेशन आयोजित

## आधार दुरुस्ती शिबिर नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात संपन्न !

➔शबनम न्यूज मीडिया ग्रुप

पिंपरी चिंचवड : विशालभाऊ वाकडकर सोशल फाउंडेशनच्या वतीने वाकड, ताथवडे, पूनावळे आणि परिसरातील नागरिकांसाठी विशेष आधार दुरुस्ती शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला असून, अनेकांनी आपल्या आधार कार्डमधील त्रुटी दूर करुन आवश्यक अद्ययावत करण्यासाठी याचा लाभ घेतला.

या शिबिरात नाव, पत्ता, जन्मतारीख, मोबाईल नंबर सुधारणा, तसेच बायोमेट्रिक अपडेट आणि नवीन आधार नोंदणी अशा महत्त्वपूर्ण सेवा पुरविण्यात आल्या. विशेषतः ज्या नागरिकांना वेळेअभावी किंवा तांत्रिक अडचणींमुळे आधार अपडेट करणे कठीण जात होते, अशा नागरिकांसाठी हे शिबिर उपयुक्त ठरले. विशालभाऊ वाकडकर यांनी सांगितले की, "आधार कार्डमध्ये



अचूक माहिती असणे नागरिकांसाठी आवश्यक आहे. शासकीय आणि वित्तीय व्यवहारांमध्ये आधारचा मोठा उपयोग असल्याने, गरजू नागरिकांना मदत करण्याच्या उद्देशाने हे शिबिर आयोजित करण्यात आले. भविष्यातही असे उपक्रम राबवले जातील."

शिबिराचा लाभ घेतलेल्या नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक केले आणि भविष्यात अशाच सुविधा उपलब्ध करुन देण्याची मागणी केली. विशालभाऊ वाकडकर सोशल फाउंडेशनच्या वतीने लवकरच आणखी समाजोपयोगी उपक्रम राबवले जाणार असल्याची माहिती देण्यात आली.

# 'जीबीएस' आजाराच्या रुग्णांना मोफत उपचार द्यावे - सुप्रिया सुळे

पुणे : पुण्यातच नव्हे तर राज्यातील इतर भागात देखील पाणी प्रदुषणाचा प्रश्न गंभीर आहे. राज्यात सत्ताधारी असलेले सरकार जनतेला किमान शुद्ध पाणी देखील देऊ शकत नाही? ही अत्यंत खेदजनक बाब आहे, अशा शब्दांत खासदार सुप्रिया सुळे यांनी राज्य सरकारवर टीका केली. 'जीबीएस' च्या रुग्णांची संख्या राज्य सरकारच्या चुकीमुळे वाढत असून सरकारने या आजाराच्या रुग्णांना मोफत उपचार द्यावेत, अशी मागणी सुळे यांनी केली. सिंहगड रस्त्यावरील भागात जीबीएस रुग्णांची संख्या वाढत आहे. या परिसराला नांदेड फाटा येथील ज्या विहिरीतून पाणी पुरवठा केला जातो. त्या



विहिरीची पाहणी करत खासदार सुळे यांनी तेथील नागरिकांशी संवाद साधत अडचणी ऐकल्या. त्यानंतर प्रसारमाध्यमांशी त्या बोलत होत्या. पाणी आणि वायू प्रदूषणाचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. केवळ पुण्यातच नाही तर इतर ठिकाणीही पाणी प्रदुषणाचा प्रश्न मोठा आहे. हे वाढत असलेले प्रदूषण कमी करण्यासाठी राज्य तसेच केंद्र सरकारच्या पातळीवर प्रयत्न होणे आवश्यक आहे. या भागात रोगराई वाढतच आहे. पाणी प्रदूषणामुळे या समस्या निर्माण होत आहे. या प्रदूषणाची वैज्ञानिक काय कारणे आहेत? हे तातडीने शोधायला पाहिजे. पाण्याबाबत आपण सातत्याने केंद्र आणि राज्य सरकारकडे पाठपुरावा करत आहे. अनेक भागात मैलापाणी शुद्धीकरण केंद्रे (एसटीपी) झाली आहेत. या भागात लोकसंख्या वाढतच आहे. यात सरकार अपयशी ठरत आहे. नागरिकांना किमान शुद्ध पाणीदेखील सरकार देऊ शकत नसेल तर ही मोठी खेदजनक बाब असल्याचे खासदार सुळे म्हणाल्या.

SHABNAM NEWS
# शबनम न्यूज
विश्वसनीय वृत्तसंस्था
|| शुक्रवार दि. 31/01/2025 ||

## नाना काटे यांना आदर्श नगरसेवक पुरस्कार प्रदान

शबनम न्यूज मीडिया ग्रुप



पिंपरी, चिंचवड : जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्युट्स यांच्या वतीने आज 8 व्या युवा संसद चे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात जाधवर ग्रुप च्या वतीने विठ्ठल उर्फ नाना काटे यांना त्यांनी केलेल्या कार्याबद्दल "आदर्श नगरसेवक" पुरस्कार देण्यात आला त्याबद्दल जाधवर ग्रुप चे नाना काटे यांनी आभार व्यक्त केले.

जाधव ग्रुप ऑफ इन्स्टिट्युट्स चा वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात याचे देखील नाना काटे यांनी कौतुक केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या, या कार्यक्रमावेळी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री मा.चंद्रकांत पाटील, माजी केंद्रीय मंत्री भागवत कराड,मा. मंत्री सुधीरभाऊ मुनगंटीवार, खासदार अरविंद सावंत, आमदार सत्यजित देशमुख,आमदार अमित गोरखे, ऍड.मंगेश ससाणे,वडगाव रासाई चे सरपंच सचिन शेलार यांना देखील उल्लेखनीय कार्याबद्दल विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.या संस्थेच्या माध्यमातून ज्या तरुणांना राजकारणात जायचे आहे अश्या तरुणांना मार्गदर्शन करण्याचे काम केले जाते या कार्यक्रमप्रसंगी जाधवर ग्रुपचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर,उपाध्यक्ष ऍड.शार्दूल सुधाकर जाधवर,संस्थेचे शिक्षक ,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सौरऊर्जेद्वारे विद्युतीकरण करा - अजित पवार

शबनम न्यूज मीडिया ग्रुप



मुंबई : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनानुसार व केंद्र शासनाच्या 'पीएम सूर्यघर मुफ्त बिजली योजने'अंतर्गत दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार सर्व राज्यांमधील शासकीय इमारतींचे 15 डिसेंबर 2025 पूर्वी सौरऊर्जेद्वारे विद्युतीकरण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्या अनुषंगाने राज्यातील सर्व शासकीय इमारतींचे सौर ऊर्जेद्वारे विद्युतीकरण करणे आवश्यक असून शासनाच्या 100 दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत हा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. त्याप्रमाणे सर्व शासकीय इमारतींचे विहित मुदतीत सौरऊर्जेद्वारे विद्युतीकरण करावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांनी दिले.राज्यातील शासकीय इमारतींचे सौर ऊर्जेद्वारे विद्युतीकरण करण्यासंदर्भात आज उपमुख्यमंत्री पवार यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या मंत्रालयातील समिती कक्षात बैठक झाली.उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, आतापर्यंत राज्यातील 1157 शासकीय इमारतींवर सौर रुफटॉप प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले आहेत. तथापि उर्वरित 332 शासकीय इमारतींवर हे प्रकल्प तातडीने कार्यान्वित करावेत. याबाबत दर तीन महिन्यांनी बैठक घेऊन आढावा घेण्यात येईल. महाऊर्जा विभागाने इमारतीवर ज्या दिवशी पॅनल बसवले त्याच दिवशी विद्युत मीटर सुरु करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. या योजनेअंतर्गत होत असलेली कामे अधिक गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार झाली पाहिजेत, असे निर्देशही त्यांनी दिले.यावेळी जिल्हा नियोजन विभागामार्फत पुणे जिल्ह्यातील शासकीय इमारतींवर कार्यान्वित होत असलेल्या सौर प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. प्रलंबित प्रकल्पांसाठी जिल्हा नियोजन समितीमधून यासाठी तातडीने निधी देण्याचे निर्देशही उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री पवार यांनी यावेळी दिले

## 'म्हाडा'च्या माध्यमातून दोन वर्षात सुमारे एक लाख घरे उभारणार



– उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई, दि. 29 :- सर्वसामान्यांच्या गृहस्वप्नपूर्तीसाठी राज्य शासन कटिबद्ध असून येत्या दोन वर्षात म्हाडाच्या माध्यमातून सुमारे एक लाख घरांच्या उभारणीस सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहे. या उद्दिष्टपूर्तीसाठी राज्याचे गृहनिर्माण धोरण लवकरच जाहीर करण्यात येणार आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केले.पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे (म्हाडाचा घटक) पुणे, पिंपरी-चिंचवड व पीएमआरडीएसह सोलापूर जिल्ह्यातील विविध गृहनिर्माण योजनेतील 3,662 सदनिकांच्या विक्रीकरिता संगणकीय सोडत उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते व उपमुख्यमंत्री तथा पुणे पालकमंत्री अजित पवार, गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, म्हाडा पुणे मंडळाचे सभापती शिवाजीराव आढळराव पाटील, 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांच्या प्रमुख उपस्थितीत दूरदृश्य प्रणालीद्वारे काढण्यात आली. यावेळी शिंदे बोलत होते.

'म्हाडा'ने गेल्या दीड वर्षात 13 सोडतींच्या माध्यमातून सुमारे 30 हजार घरे उपलब्ध करून दिली आहेत, ही कौतुकास्पद बाब असल्याचे ते म्हणाले. रखडलेले गृहनिर्माण प्रकल्प मार्गी लागावेत व झोपडपट्टी पुनर्विकास व्हावा यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. या माध्यमातूनही मोठ्या प्रमाणात गृहसाठा उपलब्ध होणार आहे.

मुंबई पुणे, ठाणे या शहरांमध्ये समूह पुनर्विकास योजनेद्वारे योजनाबद्ध गृहनिर्मिती करण्यासाठी शासनातर्फे प्रयत्न केले जात असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

पुणे येथे देखील समूह पुनर्विकास योजना राबवण्याचे सुतोवाच शिंदे यांनी केले.

## वाहन योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरण व पक्की अनुज्ञप्ती चाचणीच्या तारखेत बदल

शबनम न्यूज मीडिया ग्रुप

पुणे : महाराष्ट्र मोटार वाहन विभागातर्फे 31 जानेवारी ते 2 फेब्रुवारीदरम्यान राज्यस्तरीय रस्ता सुरक्षा क्रीडा व सांस्कृतिक अभियान 2025 चे आयोजन करण्यात आले असून या कालावधीतील योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरण व पक्की अनुज्ञप्ती चाचणीच्या तारखेत बदल करण्यात आल्याचे पिंपरी चिंचवड प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाने कळविले आहे.

राज्यस्तरीय रस्ता सुरक्षा क्रीडा व सांस्कृतिक अभियानाचे श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी येथे आयोजन करण्यात आले असून यामध्ये राज्यभरातून मोठ्या प्रमाणात मोटर वाहन विभागाचे खेळाडू सहभागी होणार आहेत. त्यामुळे योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरणाकरीता शुक्रवार 31 जानेवारी हा दिनांक आरक्षित केलेल्या वाहन मालकांनी त्यांची वाहने शनिवार 8 फेब्रुवारी रोजी निरीक्षणाकरीता सादर करावीत.

शिकाऊ व पक्की अनुज्ञप्ती चाचणीकरीता 31 जानेवारी पूर्वनियोजित वेळ घेतलेल्यांच्या वेळेमध्ये अंशतः बदल करून शिकाऊ व पक्की अनुज्ञप्ती चाचणीचे पुर्नवेळापत्रक 3 ते 7 फेब्रुवारी या कालावधीत करण्यात आलेले आहे, याची नोंद घ्यावी व त्यानुसार वाहन योग्यता प्रमाणपत्र आणि शिकाऊ व पक्की अनुज्ञप्ती चाचणीबाबतसाठी उपस्थित रहावे, असे प्रादेशिक परिवहन अधिकारी संदेश चव्हाण यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये कळविले आहे.




साप्ताहिक शबनम न्यूज बातमीपत्र मालक मुद्रक प्रकाशक सय्यद रफिक हुसेन व संपादिका शबनम सय्यद यांनी सनशाईन ग्राफिक्स डिझाईन प्रिंटिंग प्रेस येथे छापून 16 नंबर बस स्टॉप जवळ थेरगाव पिंपरी चिंचवड पुणे-33 येथून प्रकाशित केले आहे सदर बातमी मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही (न्याय कक्षा पुणे न्यायालय) अधिक माहितीसाठी संपर्क 9075624359 / 7218327321
Email - shabnamnews2015@gmail.com Website - www. Shabnamnews.In RNI.NO.MHAMAR/2015/47384

# 'आर्यन्स सन्मान २०२४'पुरस्कार सोहळा दिमाखात संपन्न

शबनम न्युज मिडिया ग्रुप

पुणे : 'वारसा परंपरेचा... अभिमान संस्कृतीचा!' या घोषवाक्यासह मनोरंजन विश्वातील मान्यवरांच्या कर्तृत्वाला सलाम आणि त्यांच्या कार्याचा सन्मान करणारा 'आर्यन्स सन्मान पुरस्कार सोहळा' संपन्न झाला. पुणे येथील स्वारगेटमधील गणेश कला क्रीडा मंच येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य-दिव्य दिमाखदार सोहळ्यात विजेत्यांना 'आर्यन्स सन्मान 2024' प्रदान करण्यात आले. या सोहळ्याला मराठी मनोरंजन विश्वातील मकरंद अनासपुरे, सुनील बर्वे, निर्मिती सावंत, सयाजी शिंदे, संदीप पाठक, आनंद इंगळे, सावनी रविंद्र, शैलेश दातार, अशोक समर्थ, पूजा पवार, उमा सरदेशमुख, मिलिंद फाटक, जगन्नाथ निवंगुणे, मिलिंद शिंतरे, अंशुमन विचारे, सुवेधा देसाई, हेमंत पाटील, प्रसाद वनारसे, निपुण धर्माधिकारी, देवेंद्र पेम, राहुल रानडे, निर्माता अमृता राव, सुरेश देशमाने, दीपक




देवराज (महाराष्ट्र आर्थिक गुन्हे विभाग आयुक्त) आदी दिग्गज मंडळी उपस्थित होती. मुख्य चित्रपट, व्यावसायिक नाटक आणि प्रायोगिक नाटकाला 1 लाख रुपये, तर तंत्रज्ञांसह इतर 25 हजार रुपये रोख रक्कम आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप होते. पुरस्कारांची एकूण रक्कम 13 लाख रुपये ओमा फाऊंडेशनकडून वितरित करण्यात आली.या सोहळ्यात आर्यन ग्रुप ऑफ कंपनीजचे सीईओ मा. मनोहर जगताप यांनी मनोरंजन विश्वाशी निगडीत असलेल्या तीन घोषणा केल्या. 6 फेब्रुवारीपासून शहाण्या लोकांनी बनवलेला 'इडियट बॉक्स' हे मनोरंजनपर ॲप सुरु करण्यात येणार आहे. चित्रपटसृष्टीतील कलाकार-तंत्रज्ञांना आर्यन्स ग्रुपच्या कोल्हापूर आणि पुणे येथे सुरु होणाऱ्या रुग्णालयांमध्ये मोफत उपचार करण्यात येतील. याखेरीज यंदा साहित्यिकांसाठी आर्यन्स सन्मान पुरस्कार आयोजित करण्यात येणार आहे. यंदा पुरस्कार सोहळ्यात सहभागी झालेल्या प्रेक्षकांमधून लकी-ड्रॉ द्वारे निवडण्यात आलेल्या पाच भाग्यवान प्रेक्षकांना 30 ऑगस्ट 2025 रोजी सिंगापूरमध्ये संपन्न होणाऱ्या तिसऱ्या आर्यन्स सन्मान पुरस्कारासाठी नेण्यात येणार आहे.

# संत मुक्ताईंच्या जीवनावर आधारित चित्रपट येणार प्रेक्षकांच्या भेटीला

शबनम न्युज मिडिया ग्रुप

मराठी सिनेसृष्टीतून सध्या नवनवीन चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत. वेगळे कथानक असलेले, अनेकविध विषयांवर आधारित चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत. आता लवकरच संत मुक्ताबाईंच्या आयुष्यावर आधारित 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. रेश्मा कुंदन थडानी यांनी या चित्रपटाची निर्मिती केली असून चित्रपटाची प्रस्तुती ए.ए.फिल्म्स ही नामांकित वितरण संस्था करीत आहे.सोशल मीडियावर नुकतेच संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई चित्रपटाचे पोस्टर प्रदर्शित झाले आहे. हा चित्रपट 18 एप्रिल 2025 ला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या पोस्टरमध्ये संत 'मुक्ताई' विठ्ठलाची आराधना करताना दिसते आहे. या चित्रपटाचे




दिग्दर्शन दिग्पाल लांजेकरने केले आहे.चित्रपटातील संगीताची जबाबदारी अवधूत गांधी, देवदत्त बाजी यांनी सांभाळली आहे. छायांकन संदीप शिंदे तर संकलन सागर शिंदे, विनय शिंदे यांचे आहे. कला दिग्दर्शन प्रतीक रेडीज, तर ड्रोन आणि स्थिर छायाचित्रण प्रथमेश अवसरे यांनी केले आहे. रंगभूषेची जबाबदारी अतुल मस्के, तर वेशभूषेची जबाबदारी सौरभ कांबळे यांनी सांभाळली आहे. नृत्य दिग्दर्शन किरण बोरकर, तर ध्वनी आरेखन निखिल लांजेकर यांचे आहे. पार्श्वसंगीत शंतनू पांडे यांनी दिले आहे. साहसदृश्ये बब्बू खन्ना यांची आहेत. सहनिर्माते सनी बक्षी आहेत. केतकी गद्रे अभ्यंकर कार्यकारी निर्मात्या आहेत.

# 'पंचायत 4' मध्ये अमिताभ बच्चन ?

शबनम न्युज मिडिया ग्रुप

'पंचायत' वेबसीरिज ही सर्वांच्या मनाच्या जवळ आहे. या वेबसीरिजने हलक्याफुलक्या विषयामुळे प्रेक्षकांच्या मनात स्थान मिळवलंय. 'पंचायत'चे तीनही सीझन चांगलेच गाजले. 2023 मध्ये आलेला 'पंचायत'चा तिसरा सीझनही प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला. आता सर्वांना उत्सुकता आहे 'पंचायत'च्या चौथ्या सीझनची. 'पंचायत 4'चं शूटिंग सध्या सुरु आहे. अशातच सेटवरील बॉलिवूडचे शहनशाहअमिताभ बच्चन यांचे फोटो व्हायरल झाले आहेत. टीव्हीएफ या निर्मिती संस्थेने 'पंचायत 4'च्या सेटवरील फोटो शेअर केलेत. या फोटोत अमिताभ बच्चन 'पंचायत 4'मधील कलाकारांशी संवाद साधताना



दिसत आहेत. या फोटोमध्ये प्रल्हाद चाचा, विकास आणि विधायक जी पाहायला मिळत आहेत. अनेकांना वाटलं की 'पंचायत 4'मध्ये अमिताभ बच्चनही दिसणार का? तर असं नाही. 'पंचायत 4'च्या सेटवर अमिताभ बच्चन का गेले होते? याचा खुलासा करण्यात आलंय.आजकाल फ्रॉड कॉल करुन लोकांना फसवण्याचं आणि त्यांच्याकडून पैसे उकळण्याचं प्रमाण वाढत चाललंय. सायबर जनजागृतीविषयी भारत सरकारच्या एका जाहिरातीसाठी अमिताभ 'पंचायत 4'च्या सेटवर गेले होते. तिथे त्यांनी 'पंचायत'मध्ये विधायकाची भूमिका साकारणारे अभिनेते पंकज झा यांच्यासोबत शूटिंग केलं. याशिवाय सेटवरील इतर कलाकारांची भेट घेऊन त्यांच्यासोबत संवाद साधला. 'पंचायत 4' वेबसीरिजचं सध्या शूटिंग सुरु असून ही सीरिज पुढील वर्षी 2026 मध्ये भेटीला येण्याची शक्यता आहे.

# शाहिद कपूरच्या 'देवा' चित्रपटाची ॲडव्हान्स बुकिंग सुरु!

शबनम न्युज मिडिया ग्रुप

गेल्या अनेक दिवसांपासून शाहिद कपूरच्या 'देवा' चित्रपटाची चर्चा सुरु आहे. येत्या शुक्रवारी हा चित्रपट रिलीज होत आहे. चित्रपट प्रदर्शित होण्यासाठी आता अवघे काही तास शिल्लक आहेत. अशात चाहत्यांमध्ये चित्रपट पाहण्याची उत्सुकता वाढत आहे, त्यामुळे निर्मात्यांनी या चित्रपटाच्या ॲडव्हान्स बुकिंगलाही सुरुवात केली आहे. ॲडव्हान्स बुकिंगची आकडेवारी पाहता शाहिदचा 2025 मधला पहिलाच चित्रपट रुपेरी पडद्यावर सुपरहिट ठरणार असं म्हटलं जात आहे.'सॅकनिल्क'ने दिलेल्या आकडेवारीनुसार, शाहिदच्या 'देवा' चित्रपटाने देशभरातील 6,673 शोमध्ये 23,013 तिकिटांची विक्री केली आहे. त्यानुसार,



आतापर्यंत या चित्रपटाने 55.43 लाख रुपयांची कमाई ॲडव्हान्स बुकिंगमधून केली आहे. या आकडेवारीत ब्लॉक सीट वगळण्यात आले आहेत. ब्लॉक सीटचाही विचार केला तर ॲडव्हान्स बुकिंगच्या कमाईची आकडेवारी थेट 1.17 कोटींपर्यंत पोहचते.दिल्लीमध्ये 18.96 लाख रुपये 'देवा'ने कमावले आहेत, तर महाराष्ट्रात 12.98 लाख रुपयांची कमाई केली आहे. कर्नाटकमध्ये 7.17 लाख रुपये, गुजरातमध्ये 15.17 लाख रुपये ॲडव्हान्स बुकिंगची कमाई झाली आहे. तसेच उत्तर प्रदेशमध्ये ॲडव्हान्स बुकिंगवर 'देवा'ने 9.59 लाख रुपयांचा गल्ला जमवला आहे. मिळालेल्या आकडेवारीनुसार, ॲडव्हान्स बुकिंग अशा पद्धतीने असल्यास चित्रपट प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवशी 4 ते 5 कोटी रुपयांची कमाई करेल, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

SHABNAM NEWS
शबनम न्यूज
विश्वसनीय वृत्तसंस्था
शुक्रवार दि. 31/01/2025

# सायबर फसवणुकीसाठी बँक खाते पुरविणारी सहा जणांची टोळी अटकेत

➔शबनम न्यूज मीडिया ग्रुप



पिंपरी : सायबर फसवणुकीसाठी बँक खाते पुरविणाऱ्या झारखंड, गुजरात, ओडिशा येथील सहा जणांच्या टोळीला पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांनी अटक केली. या आरोपींनी कंबोडियातील एकाला हजारो बँक खाती दिल्याचे दिसून आले.शुभम मोहन लोंढे ( वय 24, रा. चिखली), सॅम ऊर्फ डेविड ऊर्फ संबीधकुमार श्रीपती नायक ( वय 22, रा. ओडिशा), प्रोफेसर उर्फ हिमांशुकुमार गणेश ठाकुर ( वय 24, रा. झारखंड), राजअंश संतोष सिंग ( वय 21, भुगाव. मूळ रा. झारखंड), गौरव अनिलकुमार शर्मा ( वय 40, रा. गुजरात) आणि अंकुश रामराव मोरे ( वय 31, रा. नाशिक) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सायबर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एका गुन्ह्याचा तपास करीत असताना शुभम हा सायबर गुन्ह्यासाठी वापरण्यात येणारे बँक खाते पुरविण्याचे काम करत असल्याचे दिसून आले. त्यानुसार त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने हे खाते सॅम याला दिल्याचे सांगितले. सॅम हा दोन वर्षांपासून देशातील बँक खातेधारकाशी टेलीग्रामद्वारे संपर्क साधत होता. त्यांचे खाते कंबोडियातील आरोपीस देत होता. तो 20 पेक्षा जास्त मोबाइल नंबर वापरत असल्याचे समोर आले. त्याला 23 जानेवारी रोजी हिंजवडीतून अटक केली.हिंजवडीमधील हॉटेलवर जाऊन पोलिसांनी पाच खातेदारांना चौकशीसाठी ताब्यात घेतले. त्यांच्यासोबत लक्ष ठेवणारे 'गेट किपर'ही होते. खातेदारकांनी सापळा रचू नये, आरोपी पकडले जाऊ नयेत यासाठी ते 'वॉचर'मार्फत बँक किट ताब्यात घेऊन कुरिअरद्वारे आरोपी रहात असलेल्या बावधन येथील सदनिकेवर पाठवत होते. पोलिसांनी बावधन येथील सदनिकेवरुन राजअंश याला ताब्यात घेतले.

तो बँक किट जमा करुन कंबोडिया येथील मुख्य आरोपीला पाठवत होता.

सॅम हा दोन वर्षांपासून कंबोडिया देशातील आरोपीसोबत हे काम करत असल्याचे दिसून आले. बलसाड गुजरात येथून खाते पुरविणारा गौरव आणि अंकुश याच्यासह सहा आरोपींकडून नऊ मोबाइल, एक टॅब, दहा धनादेश बुक हस्तगत केले आहेत.

# शहरात एकाच दिवशी सात आत्महत्यांची नोंद

➔शबनम न्यूज मीडिया ग्रुप

पिंपरी : पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत एकाच दिवशी सात आत्महत्यांच्या घटनांची नोंद झाली आहे. शहरातील वाढत्या आत्महत्येच्या घटनांमुळे चिंता व्यक्त होत आहे. गौरव ज्ञानेश्वर अगम (वय ना 28) या तरुणाने खिडकीतून भिंतीला आलेल्या लोखंडी ब्रैकेटला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना चाकण पोलीस ठाण्याच्या हद्दीत सोमवारी (दि. 27) सकाळी साडेदहा वाजताच्या सुमारास उघडकीस आली.

आत्महत्येच्या दुसर्या घटनेत प्रसाद संजय अवचट (वय 31, रा. पुनावळे) या तरुणाने सोमवारी (दि. 27) दुपारी साडेचार वाजताच्या सुमारास गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे उघडकीस आले.

आत्महत्येच्या तिसर्या घटनेत विकास रामदास मुरगुंड (वय 35) या व्यक्तीने गणपत लांडगे चाळ, भोसरी येथे साडीच्या सहाय्याने गळफास घेतला. ही घटना सोमवारी (दि. 27) दुपारी बारा वाजताच्या सुमारास उघडकीस आली. आत्महत्येच्या चौथ्या घटनेत मनाप्पा सोमल्या चव्हाण (वय 52, रा. शिंदेवस्ती, नेरे, ता. मुळशी, जि. पुणे) या व्यक्तीने घरशेजारील लिंबाच्या झाडाला डोक्याच्या पटक्याने गळफास घेतला. ही घटना सोमवारी (दि. 27) सकाळी पावणे दहा वाजताच्या सुमारास घडली. आत्महत्येच्या पाचव्या घटनेत नवनाथ भगवान पवार (वय 46, रा. पवार चाळ, दत्तनगर, थेरगाव) यांनी राहत्या घराच्या बेडरुममध्ये बेडशीटच्या सहाय्याने गळफास घेतला. ही घटना सोमवारी (दि. 27) मध्यरात्री पावणे एक वाजताच्या सुमारास उघडकीस आली. मात्र मृत्यूचे नेमके कारण समजू न शकल्याने त्यांचा व्हिसेरा प्रयोगशाळेकडे आला आहे.

आत्महत्येच्या सहाव्या घटनेत सुवर्णा श्रीराम पवार (वय 36, रा. समीरा हाईटस्, ढोरेनगर, जुनी सांगवी) या महिलेने राहत्या घरात छताच्या पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घअना सोमवारी (दि. 27) रात्री 11.54 वाजताच्या सुमारास उघडकीस आली.सातव्या घटनेत इमारतीच्या आठव्या मजल्यावरुन उडी मारुन दिनेश सुरेश लोखंडे (वय 40, रा. चिखली) या व्यक्तीने आत्महत्या केली. ही घटना रविवारी (दि. 26) सायंकाळी पावणे आठ वाजताच्या सुमारास घडली. आत्महत्येचे कारण समजू शकले नाही. चिखली पोलीस याबाबत अधिक तपास करीत आहेत.

# दहशत माजविणाऱ्या टोळक्याविरुद्ध गुन्हा

➔शबनम न्यूज मीडिया ग्रुप

पुणे : सिंहगड रस्त्यावरील पानमळा परिसरात टोळक्याने दहशत माजविली. कोयते उगारुन टोळक्याने दुचाकी, रिक्षा, तसेच मोटारीच्या काचा फोडल्या. याप्रकरणी पाच ते सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत आनंद शाहू चव्हाण (वय 34, रा. शिवमल्हार सोसायटी. कोंढवा) यांनी पर्वती पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सिंहगड रस्त्यावरील पानमळा, दत्तवाडी, जनता वसाहत भागात मंगळवारी मध्यरात्री टोळके शिरले. टोळक्याने शिवीगाळ करुन दहशत माजविली, तसेच कोयते उगारुन वाहनांच्या काचा फोडण्यास सुरुवात केली. टोळक्याने रस्त्यावर लावलेल्या दुचाकी, मोटारी, तसेच रिक्षांची तोडफोड केली. दहशत माजवून टोळके पसार झाले.या घटनेची माहिती मिळताच परिमंडळ तीनचे पोलीस उपायुक्त संभाजी कदम, गुन्हे शाखेचे उपायुक्त निखील पिंगळे, सहायक आयुक्त अजय परमार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक नंदकुमार गायकवाड यांनी घटनास्थळी भेट दिली. पसार झालेल्या आरोपींचा माग काढण्यात येत असून, सहायक पोलीस निरीक्षक गंगाधर घावटे तपास करत आहेत.

# कारवाई करणाऱ्या वाहतूक पोलिसाला चप्पलने मारहाण

➔शबनम न्यूज मीडिया ग्रुप




पुणे : पदपथावर लावलेल्या दुचाकीवर कारवाई करणाऱ्या वाहतूक शाखेतील पोलीस कर्मचाऱ्याला दोन महिलांनी धक्काबुक्की केल्याची घटना हडपसर भागात घडली. वाहतूक पोलिसाला चप्पलने मारहाण केल्याप्रकरणी दोन महिलांविरुद्ध हडपसर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.याप्रकरणी बालिका सूर्यवंशी आणि संगीत लांडगे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत पोलीस हवालदार आजिनाथ आघाव यांनी हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हवालदार आघाव हडपसर वाहतूक विभागात नियुक्तीस आहेत. आरोपी महिलांनी हडपसर परिसरातील गाडीतळ भागात बेशिस्तपणे दुचाकी लावली होती. मंगळवारी सकाळी अकराच्या सुमारास पदपथावर लावलेल्या दुचाकींवर कारवाई करण्यात येत होती. वाहने उचलणाऱ्या गाडीतील कर्मचारी (टोईंग व्हॅन) आरोपी महिलांची दुचाकी उचलत होते. त्या वेळी आरोपींनी कारवाईस विरोध करुन हवालदार आघाव यांच्याशी वाद घालण्यास सुरुवात केली.आरोपींनी हवालदार आघाव यांना चप्पलने मारहाण करुन धक्काबुक्की केली. त्यांनी आघाव यांना धमकावले. सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी दोघींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक अल्ताफ शेख तपास करत आहेत.

# शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने महिलेची 32 लाखांची फसवणूक

➔शबनम न्यूज मीडिया ग्रुप

पुणे : शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने सायबर चोरट्यांनी महिलेची 32 लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी एका महिलेने फिर्याद दाखल केली असून सायबर चोरट्यांविरुद्ध तंत्रज्ञान कायदा तसेच फसवणूक केल्याप्रकरणी विश्रामबाग पोलिसांनी गुन्हा दाखल केला.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला नारायण पेठेत राहायला आहे. त्यांच्या मोबाइल क्रमांकावर गेल्या वर्षी मे महिन्यात शेअर बाजारात गुंतवणुकीचे आमिष दाखविणारा संदेश पाठविण्यात आला होता.

चोरट्याने त्यांना गुंतवणूक केल्यास चांगला परतावा देण्याचे आमिष दाखविले होते. त्यानंतर चोरट्याने त्यांना एका समाज माध्यमातील समूहात घेतले. समूहात शेअर बाजारातील विविध योजनांची माहिती दिली.महिलेने चोरट्याने दिलेल्या बँक खात्यात पैसे गुंतविले. सुरुवातीला महिलेला परतावा मिळाल्याने तिचा विश्वास बसला. त्यानंतर चोरट्याने महिलेकडून वेळोवेळी पैसे घेतले. महिलेने चोरट्याच्या खात्यात 32 लाख रुपये जमा केले.

महिलेला परतावा देण्यात आला नाही.

महिलेने चोरट्याच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला. तेव्हा मोबाइल क्रमांक बंद असल्याचे लक्षात आले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयमाला पवार तपास करत आहेत.

# ईव्हीएम व व्हीव्हीपॅटची तपासणी व पडताळणी प्रक्रियेबाबत बैठक संपन्न

➯शबनम न्यूज मीडिया ग्रुप



पुणे : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार उप जिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय येथे बुधवारी (दि.29) आयोजित बैठकीत ईव्हीएम व व्हीव्हीपॅटची तपासणी व पडताळणी प्रक्रियेविषयी माहिती देण्यात आली. यावेळी उपजिल्हाधिकारी मिनाज मुल्ला, मनोज खैरनार, अनिल पवार, रेवणनाथ लबडे, स्वप्नील मोरे, यशवंत माने, निवडणूक शाखा तहसीलदार राहूल सारंग तसेच मान्यता प्राप्त राजकीय पक्षाचे उमेदवार व प्रतिनिधी उपस्थित होते. कळसकर म्हणाल्या, जिल्ह्यात ईव्हीएम व व्हीव्हीपॅटची तपासणी व पडताळणीच्या अनुषंगाने एकूण 11 अर्ज संबंधितांकडून प्राप्त झाले होते, त्यापैकी एका उमेदवारांने अर्ज माघारी घेतला आहे. तसेच 7 अर्जाच्या अनुषंगाने न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे उर्वरित 3 अर्जावर ईव्हीएम व व्हीव्हीपॅट तपासणी व पडताळणीची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. न्यायालयीन याचिकेबाबत आदेश प्राप्त झाल्यास त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल, असेही कळसकर म्हणाल्या.यावेळी उमेदवार व प्रतिनिधींच्यावतीने बैठकीत विविध सूचना करण्यात आल्या.

# राष्ट्रवादीचे जुबेर बाबू शेख यांच्या मागणीला यश

## आपला प्रभाग हा पुणे शहरातील स्मार्ट प्रभाग कसा होईल यासाठी प्रयत्न करणार - दिलशाद जुबेर शेख

➯शबनम न्यूज मीडिया ग्रुप



पुणे महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक 19 मधील काशीवाडी व लोहिया नगर परिसरात सार्वजनिक शौचालयाची अत्यंत दयनीय अवस्था झाली त्यामुळे या सार्वजनिक शौचालयांची दुरुस्ती करावी अशी मागणी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अल्पसंख्यांक सेलचे शहराध्यक्ष जुबेर बाबू शेख यांनी पुणे महानगरपालिकेचे उपायुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली. तसेच तात्काळ मनपा प्रशासन वतीने शौचालय साफसफाई दुरुस्ती करण्याची मागणी केली त्यांच्या या मागणीला मोठे यश आले असून मनपा प्रशासनाने आज गुरुवार सकाळीच मनपा प्रशासन आरोग्य विभागा वतीने संबंधित शौचालय यांची साफसफाई करण्यास सुरुवात झाली. या परिसरातील नागरिकांनी जुबेर बाबू शेख यांचे आभार व्यक्त केले आहे याबाबत जुबेर बाबू शेख यांनी आपल्या प्रतिक्रिया देताना सांगितले की राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या अंतर्गत आपण आपल्या परिसरात अनेक विविध विकासकामे सुरु केली असून सामाजिक कार्यकर्त्या दिलशाद जुबेर शेख याही आपल्या खांद्याला खांदा लावून सामाजिक कार्यात अग्रेसर आहेत, त्यांनीही आपल्या प्रतिक्रिया देताना सांगितले की आपला हा प्रभाग पुणे शहरातील स्मार्ट प्रभाग कसा होईल यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे दिलशाद जुबेर शेख यांनी सांगितले

# श्री मंगलमूर्तींच्या माघी रथयात्रेचे चिंचवड येथून मोरगावकडे प्रस्थान

➯शबनम न्यूज मीडिया ग्रुप



चिंचवड - चिंचवड येथील श्रीमन् महासाधू श्रीमोरया गोसावी महाराज प्राप्त श्रीमंगलमूर्तीची पारंपरिक माघी रथयात्रा मोठ्या भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात प्रारंभ झाली. श्री मोरया गोसावी महाराजांनी सुमारे 526 वर्षांपूर्वी सुरु केलेली ही यात्रा अखंडपणे सुरु असून, यंदाही मोठ्या भक्तसमुदायाच्या उपस्थितीत तिचे आयोजन करण्यात आले आहे. पालखी 8 फेब्रुवारीला चिंचवड येथे परतणार आहे.

चिंचवड येथील गाणपत्य संप्रदायातील महान संत श्रीमन् महासाधू श्रीमोरया गोसावी महाराज यांना सन 1489 मध्ये मोरगावच्या पवित्र श्री गणेश कुंडातून प्राप्त झालेले श्री मंगलमूर्ती माघ महिन्यात मोरगाव येथे नेण्याची परंपरा सुरु केली. ही परंपरा गेल्या 526 वर्षांहून अधिक काळ अविरतपणे सुरु आहे. यावर्षीही, चिंचवड येथील श्री मंगलमुर्ती वाडा येथून माघी रथयात्रेस भव्य सुरुवात झाली. यावेळी देवस्थानचे मुख्य विश्वस्त मंदार महाराज देव, विश्वस्त श्री जितेंद्र देव व श्री केशव विद्वांस तसेच उपस्थित होते. या सोहळ्यात हजारो भक्तांनी सहभागी होत श्री मोरया गोसावी महाराज प्राप्त श्री मंगलमूर्तीचे दर्शन घेतले.

**भक्तांसाठी आवाहन**

चिंचवड देवस्थान ट्रस्टच्या वतीने सर्व भक्तगणांना या पवित्र सोहळ्यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या भक्तिमय आणि ऐतिहासिक पालखी सोहळ्यात सहभागी होऊन श्री मोरया गोसावी महाराज प्राप्त मंगलमूर्तीचे दर्शन घेण्याची सुवर्णसंधी लाभावी, असे आवाहन देवस्थान ट्रस्टच्या विश्वस्तांनी केले आहे.

# आता 'जीबीएस'ची चाचणी थेरगाव रुग्णालयात होणार!

➯शबनम न्यूज मीडिया ग्रुप




पिंपरी : गुईलेन बॅरे सिंड्रोम (जीबीएस) या आजाराचे निदान करण्यासाठीची 'एनसीव्ही' चाचणी महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय (वायसीएम) आणि नवीन थेरगाव रुग्णालयात मोफत केली जाणार आहे. या आजाराची माहिती देण्यासाठी हेल्पलाइन सुरु करण्यात येणार आहे.गुईलेन बॅरे सिंड्रोम (जीबीएस) या आजाराचे शहरात 15 संशयित रुग्ण आढळून आले आहेत. पिंपरी, वाकड, भोसरी, पिंपळेगुरव, चिखली, तळवडे या भागात रुग्ण आढळले आहेत. या भागातील पिण्याच्या पाण्याची तपासणी करण्यासाठी नमुने पुण्यातील सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेत पाठविले आहेत. विहिरी, बोरवेल, टँकर मार्फत पिण्यासाठी वापरल्या जाणा-या पाण्याचे 'क्लोरीन' तपासले जाणार आहे.शहरातील खासगी रुग्णालयांकडे 'इम्युनोग्लोब्यूलिन' इंजेक्शन नसल्यास त्यांनी गुईलेन बॅरे सिंड्रोमच्या रुग्णांना दाखल करुन घेऊ नये, महापालिकेच्या रुग्णालयात पाठविण्याच्या सूचना दिल्या आहेत. शहरातील रुग्णवाढ स्थिर आहे. या आजाराचे रुग्ण आढळून आलेल्या परिसराचे सर्वेक्षण सुरु आहे. आठ रुग्णालय विभागाअंतर्गत प्रत्येकी दोन असे एकूण 16 पथके तयार करण्यात आली आहेत.

# मराठी साहित्य संमेलनाला सर्वतोपरी पाठबळ : मुख्यमंत्री



नवी दिल्लीमध्ये होणाऱ्या 98 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला सर्वतोपरी पाठबळ दिले जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्ली येथे सांगितले. दिल्लीत 21 ते 23 फेब्रुवारी 2025 दरम्यान होणारे साहित्य संमेलन यशस्वी होईल, असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. कोपर्निकस मार्गस्थित महाराष्ट्र सदनातील साहित्य संमेलनासाठीच्या कार्यालयाचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन झाले. याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमास केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ उपस्थित होते. याप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, दिल्लीत होणारे साहित्य संमेलन निश्चित भव्य असे होईल.

हे संमेलन देश नव्हे, तर जगभरातील मराठी माणसांकरिता अभिमानास्पद ठरेल. साहित्य संमेलनाचे आयोजन यशस्वी व्हावे यासाठी विविध यंत्रणा समन्वयाने कार्यरत आहेत. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर आणि मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर दिल्लीत होणाऱ्या या संमेलनास विशेष महत्व आहे.

राजधानीत होणाऱ्या साहित्य संमेलनाबाबत मराठी साहित्यिक उत्सूक असून हे संमेलन विचारप्रवर्तक ठरेल, साहित्य संमेलनासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना निमंत्रित केल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.


अखिल मराठी पत्रकार संस्था (महाराष्ट्र राज्य) संलग्न
PRESS
पिंपरी चिंचवड शहर पत्रकार संघ
TOP TEN PCMC AWARD 2025
अखिल मराठी पत्रकार संस्था (रजि) महाराष्ट्र राज्य संलग्न
पिंपरी-चिंचवड शहर पत्रकार संघ
पत्रकार दिनानिमित्त PCMC TOP TEN पुरस्कार वितरण सोहळा २०२५
पुरस्कार्थी
मा.श्री.कृष्णकुमार गोयल
सहकार व उद्योग क्षेत्र
मा.श्री.इरफान सय्यद
कामगार क्षेत्र
मा.ऋतुराज गायकवाड
भारतीय क्रिकेटपट्टू
मा.श्री.गणेश यादव
पत्रकारिता
मा.डॉ.श्री.लक्ष्मण गोफणे
उत्तम प्रशासन
मा.श्री.संदिप साकोरे
कला व नाट्य क्षेत्र
मा.श्री.विजय जगताप
लेखक व सामाजिक क्षेत्र
मा.डॉ.श्री.बी.सी.डोळस
वैद्यकीय क्षेत्र
मा.सौं.अंजू सोनवणे
प्रेरणादायी रक्तदाते
PCET'S INFINITY 90.4 FM Reflecting you
पी.सी.ई.टी.रेडीओ एफएम
प्रसार व मनोरंजन क्षेत्र
सर्व पुरस्कार्थी यांचे
हार्दिक अभिनंदन...
-- शुभेच्छुक --
SHABNAM NEWS
शबनम सय्यद
संपादिका : शबनम न्यूज